MHBI110002282026

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५९/२०२६ मधील नि.१ वरील आदेश</u>

बाबुराव कोकाट व इतर-५ वि. कोणी नाही...

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सादर केला आहे.

<u>अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे</u> -

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ ची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ६ यांची आई नामे सुमन भ्र. बाबुराव कोकाट ही दि.२१/०६/२०२४ रोजी ठाकरआडगाव, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाली आहे. मयत सुमन भ्र. बाबुराव कोकाट यांना अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यांचे मृत्यूनंतर शासकीय तथा निमशासकीय कामकाजाकरिता अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दि.२२/०१/२०२६ रोजीचे 'दैनिक बीड किसान' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली. सदर वर्तमानपत्राची प्रत नि.१० वर दाखल आहे. मयत सुमन भ्र. बाबुराव कोकाट यांचे मृत्यू प्रमाणपत्र नि.६ वर आहे.

४. उपरोक्त वर्तमानपत्रामधील नोटीसीद्वारे जाहीर प्रगटन काढून सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत सुमन भ्र. बाबुराव कोकाट यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप मागविणेत आले. परंतु आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

५. अर्जदार यांनी अर्जामधील कथनांच्या पुष्ठ्यर्थ अर्जदार क्र.१ याचे नि.११ कडे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. मुळतःच अर्जास कोणीही आक्षेप घेतलला नसल्याने त्यांचा सरतपास अबाधीत राहीला आहे. शपथपत्रातील कथने खोटी आढळल्यास त्याबाबतच्या शिक्षेस ते पात्र राहतील.

६. उपरोक्त विवेचनाचा साकल्याने विचार करता अर्जदार हे मयत सुमन भ्र. बाबुराव कोकाट यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ ते ६ हे मयत सुमन भ्र. बाबुराव कोकाट यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

३) नियमाप्रमाणे कोर्ट फी भरल्यानंतर अर्जदार क्र.१ ते ६ यांचे नावे विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

MOMIN HANIF MOINUDDIN
Digitally signed by MOMIN HANIF MOINUDDIN
Date: 2026.03.20 16:30:39 +0530

दिनांक : २०/०३/२०२६

**( एच.एम. मोमीन )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गेवराई.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 20-03-2026 |
| Transcribed on | :- | 20-03-2026 |
| Checked & Signed on | :- | 20-03-2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer G-3, Georai.